# इंडस हेल्थ प्लसतर्फे पोलिसांची आरोग्य तपासणी




**इंडस हेल्थ प्लसतर्फे शिवाजीनगर पोलिस मुख्यालयात पोलिस व वाहतूक अधिकाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.**

**पुणे :** जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून इंडस हेल्थ प्लसतर्फे शहर पोलिस आणि वाहतूक अधिकाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

शिवाजीनगर येथील पोलिस मुख्यालयात तीन दिवसांच्या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सीरम बिलिरुबीन, एसजीपीटी, एसजीओटी, ब्लड युरिया, युरीन आणि ग्लायकोस्लायटेड हिमोग्लोबिनच्या तपासण्या करण्यात आल्या असून, पहिल्याच दिवशी २०० पोलिस अधिकाऱ्यांची तपासणी करण्यात आली. यावेळी पोलिस आयुक्त सतीश माथुर, इंडस हेल्थ प्लसच्या संचालिका कांचन नाईकवाडी उपस्थित होत्या.

नाईकवाडी म्हणाल्या, शहराचे काम सुरळीत चालवण्यासाठी पोलिस व वाहतूक अधिकारी अहोरात्र अथक परिश्रम करीत असतात. या सर्वांना आपल्या आरोग्याविषयी माहिती व काळजी घेता यावी यासाठी शिबिर घेणे गरजेचे आहे.

सतीश माथुर म्हणाले, धावपळीच्या जीवनशैलीमुळे पोलिसांच्या आरोग्यावर परिणाम होतो. या शिबिरातून मिळणाऱ्या माहितीद्वारे आरोग्याची नक्कीच काळजी घेता येणार आहे. यादरम्यान प्रत्येकाला १ वेलकम किट व वैद्यकीय समुपदेशन करण्यात आले. आज (बुधवार) सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत शिबिर सुरू असणार आहे.